# जहरी पेय

गुरुनाथ नाईक

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B266

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**जहरी पेय : गुरुनाथ नाईक**

© **गुरुनाथ नाईक**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १३०/-

## अनुक्रमणिका

जहरी पेय / ५
भेदरलेली तरुणी / ७७

# जहरी पेय

# १

वातावरण भयंकर होते. आव्हान आणि प्रतिआव्हानांचे. परिस्थितीच अशी होती, की कोणत्यावेळी नेमके काय घडेल, हे सांगणेही अशक्य होते. वातावणात मात्र बाह्यदर्शनी शांतता होती.

स्मशान शांतता पसरली होती.

रातराणी मोटारसायकलवरून उतरली. त्या ठिकाणी तर अधिकच भयाणता होती. एका बंगल्याजवळ तिने मोटारसायकल ढकलत नेली.

आव्हान स्वीकारले नसते, तर मात्र रातराणीने यावेळी येण्याचा धोका पत्करला नसता. शिवाय ती आली होती याची कल्पना तिने जगदीशला देखील दिली नसती; कारण या बदमाशांपुढे सध्यातरी जगदीशचे काही चालेल, यावर तिचा विश्वास नव्हता.

उलटच्या काळजाच्या आणि अत्यंत धूर्त अशा बदमाशांशी आपली गाठ आहे, याची खात्री तिला पटली होती.

बंगल्याच्या कुंपनाजवळ अंधारात मोटारसायकल स्टँड करून रातराणी निघाली, तेव्हा निळ्या रंगाचा बेलबॉटम आणि लाल रंगाचे जॅकेट तिच्या अंगावर होते. हातात मोजे होते; पण डोळ्यांवर बुरखा घालण्याची तिला इतक्यातच गरज नव्हती.

ती पाच मजली इमारतीजवळ आली. ज्या रस्त्याने ती चालली होती, तो रस्ता त्या इमारतीच्या मागच्या बाजूचा. एकूण दोन व्यक्ती तिने अंधारात फिरताना पाहिल्या.

ज्या इमारतीजवळून ती आता चालली होती, त्या इमारतीत शिरण्याची पोलिसांत ही हिमंत नव्हती.

चुकून कशीबशी पोलिसांची धाड त्या इमारतीवर पडायची. एक-दोन जीप गाड्या यायच्या. पोलिसांनी खच्चून भरलेली एक व्हॅनदेखील बरोबर असायची.

आणि धाड घालण्यासाठी आलेले पोलिस अधिकारीदेखील हात हलवत जसे आले तसे फिरायचे.

कारण बदमाशांचे हात अतिशय दूरवर पसरले होते. पोलीस खात्यातदेखील त्यांची माणसे होती. पोलिसांच्या हालचालींची खडान्‌खडा माहिती आपणाला मिळावी, अशी चोख व्यवस्था बदमाशांनी केलेली होती.

आणि हे रातराणीला माहीत होते.

दूरवरचा वळसा घालून ती इमारतीच्या पुढच्या भागात आली. इमारतीच्या समोर जाण्याचे धैर्य तिला झाले नाही. कदाचित एखादा बदमाश आपल्याकडे संशयानेदेखील पाहू शकेल, असे तिला वाटले.

इमारतीच्या समोर दूरवर रेंगाळणारी माणसे नजरेने टिपली. आणखी दोन माणसे समोरच्या फुटपाथवर होती. ती बदमाशांची माणसे की साध्या वेशातील पोलीस, हे दुरून समजायला मार्ग नव्हता.

भाईसाब अग्यारी हा त्या इमारतीचा मालक, 'भाईसाब' याच नावानं तो ओळखला जात होता. त्याला फारच थोड्या लोकांनी पाहिले होते. या भाईसाबचे काम करणारी सामान्य माणसे आपण मालकाला पाहिलेच नाही, असे पाच-सात वर्षे नोकरी करूनदेखील सांगत होते.

जी व्यक्ती त्या इमारतीत शिरली आहे, ती व्यक्ती जिवंत बाहेर येईल, असे रातराणीला वाटत नव्हते. या घटनेची माहिती आपण पोलिसांना द्यावी आणि मदन पारीखला बदमाशांच्या हातून वाचवावे, इथंपर्यंत तिच्या मनाने निर्णय घेतला होता.

मदन पारीख हा त्यांचा एक वेटर माणूस भाईसाब अग्यारीकडे जवळजवळ सात वर्षे काम करीत होता... पण केवळ संशयाने भाईसाब अग्यारीने त्याला ठार करण्याचा तीन वेळा प्रयत्न केला होता.



मदन आणि त्याच्या बायकोचे बोलणे रातराणीने ऐकलेले होते. दोघांच्याही बोलण्यावरून बऱ्याचशा गोष्टी तिला समजल्या होत्या. मदनने भाईसाबला भेटायला जावे, हे त्याच्या बायकोला पटण्यासारखे नव्हते.

तसे पाहता रातराणीला कुणीही आव्हान दिले नव्हते. मदन पारीख हा स्वतःहून मृत्यूच्या दाढेत जाणार आहे आणि त्याला वाचवणे आपले कर्तव्य आहे, याच जाणीवेने परिस्थितीचे हे आव्हान तिने स्वीकारले होते.

कारण, मदन पारीखने बदमाशांशी असलेला आपला संबंध तोडला होता. जे काही पैसे कमावले होते, त्यातून प्रामाणिकपणे काहीतरी करण्याचा निर्णय त्याने घेतला होता; पण भाईसाब अग्यारीला तो पसंत नव्हता. एक ना एक दिवस तो आपल्या व्यवहाराची खडान्‌खडा माहिती पोलिसांना देईल, अशीच भाईसाबची समजूत होती.

मदन पारीख पोलिसांकडे गेला आणि सारी कथा सांगून पोलिसांचे संरक्षण त्याने मागितले, तरीही भाईसाबच्या हातून तो सुटणार नाही, हे रातराणीला देखील पटले होते.

फक्त प्रश्न होता त्या इमारतीत शिरण्याचा; निदान इमारतीत प्रवेश होईपर्यंत तरी आपला सुगावा कोणाला लागू नये, असेच तिला वाटत होते. यावरून कडक बंदोबस्त असला तरी इमारतीतून बाहेर पडणे तिच्या दृष्टीने तितकेसे अवघड नव्हते.

मदन पारीख त्या इमारतीत किती वाजता शिरेल, याची रातराणीला कल्पना होती. ठीक बारा वाजता आपण येणार आहोत, असाच फोन त्याने केलेला आहे, हे तो बायकोला सांगत असताना रातराणीने ऐकले आणि त्यापूर्वीच आपण इमारतीत शिरायला पाहिजे, हाच निश्चय तिने केला होता.

त्यावेळी अकरा वाजून दहा मिनिटे झाली होती.

आजूबाजूला नीट पाहत तिने आपले लक्ष शेजारच्या इमारतीकडे केंद्रीत केले. दोन इमारतींच्या मध्ये जवळजवळ आठ फुटांचे अंतर होते तेवढे अंतर आपल्याला तोडता येईल, याची तिला शंका होती.

कोणताही मागचा पुढचा विचार न करता तिने रस्ता ओलांडला. फूटपाथवरून फिरत फिरत ती शेजारच्या इमारतीजवळ आली. ती अशा

जागी पोचली होती, की पलीकडच्या इमारतीसमोर असलेल्या बदमाशांना ती स्पष्टपणे दिसत होती. आपल्या हालचालीत चोरटेपणा आला तर संशयाने बदमाश आपल्या मागे लागतील, अशीही भीती तिला वाटत होती.

पण संशय आला तरी बदमाशांना आपल्यामागे लागण्याचे कारण काय, हेच तिला समजत नव्हते. इमारतीत शिरेपर्यंत तरी आपणाला घाबरण्याचे कारण नाही, असेच ती मनाला सारखी बजावत होती.

बेधडक ती इमारतीत शिरली. जिन्यात भरपूर उजेड होता. पहिल्या आणि दुसऱ्या मजल्यावर कार्यालये होती, तर वरच्या तीन मजल्यांवर बडी मंडळी राहत होती.

पाच जिने चढून ती एका दाराजवळ थांबली. त्या दाराला आतून कडी होती. तिने ती कडी काढली आणि हलकेच बाहेर आली. गार वारा अंगाला झोंबत होता.

रातराणी आता त्या इमारतीच्या टेरेसवर होती. त्याच टेरेसवरून आपण शेजारच्या इमारतीत प्रवेश करू, याविषयी तिच्या मनात शंका असली; तरी जिद्द मात्र कायम होती.

हलकेच ती टेरेसच्या कठड्याजवळ आली. त्या इमारतीचा कठडा प्रमाणापेक्षा उंच होता. तिने भाईसाब अग्यारीच्या इमारतीकडे पाहिले. भाईसाबच्या इमारतीपेक्षा रातराणी असलेली ही इमारत चार-पाच फुटांनी उंच होती. कदाचित आपणाला याच कमी-जास्त उंचीचा फायदा मिळू शकेल, असे रातराणीला वाटत होते.

पावणेबारा वाजले आणि रातराणी बेलाशक टेरेसच्या कठड्यावर चढली. खाली अंधारात पाहताच शरीर शहारल्यासारखे झाले. नकळत अंगावर सरसरीत काटा उभा राहिला; पण क्षणात तिने स्वतःला सावरले. मागचा पुढचा विचार न करता बेलाशक संपूर्ण शरीर समोरच्या इमारतीकडे झोकून दिले.

तिचा अंदाज थोडा चुकला, पलीकडच्या इमारतीच्या कठड्यावरून तिचे पाय पुढे घसरले. पाठीचा कणा कठड्यावर घासला गेला; पण त्याही परिस्थितीत तिने आपले डोके सांभाळले.



डोके सांभाळण्याच्या नादात तिचा डावा खांदा दुखावला गेला. सुन्न होऊन ती जागच्या जागी बसली. दुखावलेल्या पाठीच्या कण्यावरून हात फिरवला. तसे पाहता गंभीरपणे विचार करण्याइतक्या त्या जखमा नव्हत्या; पण हालचाली करताना मात्र नकळत तोंड वेडेवाकडे होत होते.

पाण्याच्या टाकीजवळून हलकेच ती पुढच्या बाजूला आली. आपण जी उडी घेतली, तिचा आवाज बदमाशांनी ऐकलेला नाही, याचीही तिला खात्री होती. आणि ते करता करताच तिला ठरलेल्या वेळी मदन पारीख त्या इमारतीत शिरतो की नाही, हे पाहायचे होते.

किंचित डोके वर काढून ती त्या इमारतीचा समोरचा रस्ता न्याहाळत होती. इमारतीवर बदमाशांचा पूर्वीसारखाच कडेकोट पहारा आहे, हे तिच्या नजरेने टिपले होते.

बाराला पाच मिनिटे कमी असताना एक आलिशान कार इमारतीच्या समोर उभी राहिली. घाईघाईत पुढची दोन्ही दारे उघडली गेली. ड्रायव्हर आणि तगडा जवान असे दोघे बाहेर पडले. एकाने घाईघाईत मागच्या बाजूचे दार उघडले. रातराणी श्वास रोखून त्या कारकडे पाहत होती.

एक उंच आणि सूट घातलेला माणूस खाली उतरला. त्याचे केस पिकलेले असले तरी त्याच्या वयाचा अंदाज करणे कठीण होते. तो भाईसाहेब अग्यारी असावा, याची खात्री रातराणीला पटली.

ड्रायव्हरबरोबर खाली उतरलेल्या दणकट तरुणाबरोबर तो इमारतीत शिरला आणि संथपणे कार इमारतीच्या उजव्या बाजूला असलेल्या गल्लीत शिरली.

बारा वाजले. रातराणीने दोन्ही बाजूंच्या रस्त्यावर दूरवर नजर फेकली. कोणत्याही क्षणी मदन पारींख येईल, याची तिला खात्री होती. बायकोने कडक विरोध केला तर कदाचित तो येणारही नाही, असाही विचार अधूनमधून तिच्या डोक्यात घोळत होता.

डाव्या बाजूकडून एक कार भरवेगात येत असताना तिने पाहिली. त्याचवेगात करकचून ब्रेक दाबून ती फियाट अग्यारीच्या इमारतीसमोर उभी राहिली. भारदस्त व्यक्तिमत्त्वाचा मदन पारीख कारमधून खाली उतरला.

त्याचा चेहरा दिसत नसला तरी याक्षणी तो बेदरकार बनला आहे, हे त्याच्या हालचाली पाहून रातराणीने ओळखले.

इमारतीच्या समोरच्या बाजूला दूर दूर पांगलेली पाच माणसे सावधगिरीने इमारतीच्या पुढे सरकताना तिने पाहिली. तोपर्यंत मदन पारीख इमारतीत शिरला होता.

यावेळी आपण नेमकी कोणती हालचाल करावी, याचा विचार रातराणी करत होती. मदन पारीख त्या इमारतीतून जिवंत निसटण्याची शक्यता तिच्या दृष्टीने फारच कमी होती; पण इतक्यातच घाईघाईत भाईसाब त्याला ठार करील यावरदेखील तिचा विश्वास नव्हता.

विचारांच्या तंद्रीत असतानाच आणखी एक कार तुफान वेगाने आलेली मागे फिरणाऱ्या रातराणीने पाहिली. दचकून तिने त्या कारकडे पाहिले. चाकांचा करकर आवाज करीत ती कार मदन पारीखजवळ थांबली.

मागच्या बाजूचे दार घाईघाईत उघडले गेले. पुढून दोन तरुण उतरले आणि तोंड बांधलेल्या एका तरुणीला बाहेर खेचण्यात आले. तिचे हात-पाय बांधलेले क्षणाचाही विलंब न लावता तिला इमारतीत नेण्यात आले.

या एकाच घटनेवरून भाईसाब अग्यारी हा किती उलटच्या काळजाचा आहे, स्वतःच्या माणसांपेक्षाही त्याचा स्वतःवर किती विश्वास आहे, हे रातराणीने ओळखले. रात्र असली तरी त्या गजबजलेल्या भागात असा कैदी आणणे किती धोक्याचे आहे, याची कल्पना रातराणीला होती. पण तोही धोका भाईसाब अग्यारी अगदी सहजरीत्या पत्करत होता.

आता मात्र आपण हालचाल करायलाच हवी, असे रातराणीला वाटले. ती स्त्री कोण, हे मात्र तिला समजू शकले नाही किंवा कोणताही तर्क ती करू शकली नाही. कदाचित मदनप्रमाणेच टोळीतून बाहेर पडण्याची आणि प्रामाणिकपणेच जगण्याचा गुन्हा तिनेही केला असावा, असा विचार रातराणीच्या मनात आला.

हळूहळू पाण्याच्या टाक्यांजवळून ती एका दाराजवळ आली. ते दार आतून बंद असेल, अशीच त्याची कल्पना होती; पण तिथे फक्त



अर्धे दार शिल्लक होते आणि मोडलेले अर्धे दार टेरेसच्या कठड्याला टेकवून आडवे ठेवले होते.

हलक्या पावलांनी ती खाली उतरली. जिन्यावरचा अंधार तिला भयाण वाटला. आपण हा धोका पत्करत आहोत; पण या इमारतीची रचना आपल्याला ठाऊक नाही, हिच चिंतेची बाब होती. आपल्या हातून चूक झाली तर जगण्याची आशा कमी आहे, असाही विचार तिच्या मनात डोकावत होता.

कानोसा घेत दोन जिने ती खाली आली; पण कुणीही बदमाश तिला वाटेत भेटला नाही. धोका जाणून ती अतिशय सावध बनली होती. तिच्या उजव्या हातात सायलेन्सर लावलेले पिस्तूल होते... लांब नळीचे त्या खास पिस्तुलाचा मारा शंभर मीटरांपेक्षा अधिक होता.

ती बारकाईने कानोसा घेत होती. कुठून तरी बोलण्याचा आवाज आपल्या कानात शिरेल असेच तिला वाटत होते.

खाली उतरण्यासाठी दुसऱ्या जिन्याकडे जाता जाताच ती थबकली. अस्पष्टशी हालचाल तिने डाव्या बाजूला पाहिली. कुणीतरी घाईघाईत एका दारातून आत शिरलेले तिने पाहिले. ते दार सताड उघडेच असल्यामुळे दाराचा आवाज होणे शक्य नव्हते.

जिना उतरण्यासाठी जर का आपण दोन पावले पुढे टाकली असती, तर आपली हालचाल त्या बदमाशांच्या नजरेतून मुळीच सुटली नसती, या जाणीवेने तिचे शरीर शहारले

सावकाश तिने खिशातून काढलेला बुरखा तोंडावर घातला. जवळजवळ पाच मिनिटे ती कानोसा घेण्यासाठी थांबली आणि हळूहळू हलक्या पावलांनी तिने त्या दाराकडे सरकायला सुरुवात केली. नजरेपेक्षा यावेळी तिने आपल्या कानांवर अधिक भरवसा ठेवला होता. अस्पष्टशीदेखील हालचाल टिपण्यासाठी तिचे कान सज्ज होते.

हलक्या पावलांनी ती दुसऱ्या दाराजवळ आली आणि अस्पष्टसे आवाज तिच्या कानात शिरू लागले.

कुणीतरी अधिकार वाणीने बोलत होते. बोलणारी व्यक्ती तरुण आहे का वृद्ध, हे समजायला मार्ग नव्हता. कारण, तो आवाज अगदी जवळून येत नव्हता किंवा स्पष्टपणे ऐकू येत नव्हता.